जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-28

वरुड | शनिवार

०७.०२.२०२६

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: ०७ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712


## थोडक्यात

### चंद्रपूर पालिकेसाठी काँग्रेसच्या सत्तेचा फॉर्म्युला ठरला, अडीच वर्ष धानोरकर गटाचा महापौर

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**चंद्रपूर** - महापौर पदाची मर्यादा अडीच वर्षाची असते आणि अडीच वर्षांनी पुन्हा आरक्षण इथे लागू होऊन महापौर निवडला जातो. त्यानंतर तो बदलणारच आहे. त्यामुळे पहिले अडीच वर्षे चंद्रपूर मनपात धानोरकर गट आणि उरलेले अडीच वर्षे माझ्या गटाचा महापौर असेल, अशी माहिती काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे. भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांचं वक्तव्य आणि उद्रेक हे आपल्याला पाहायलं मिळाले आहे. आम्ही ठरवलं कि आम्ही एकच फॉर्म भरायचाय. प्रतिभा धानोरकर यांना महापौर निवडण्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे तीन महिलांचे अर्ज काढून घेण्याचे काम प्रतिभा धानोरकर यांचा आहे.

# रितू तावडे मुंबईच्या महापौरपदी तर संजय घाडी उपमहापौर

## भाजप-शिवसेनेकडून घोषणा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** - मुंबई मनपाच्या महापौरपदी भाजपकडून रितू तावडे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. मुंबईच्या उपमहापौरपदी शिंदेसेना शिंदे गटाकडूनसंजय शंकर घाडी यांची निवड करण्यात आली आहे. पुढील सव्वा वर्षांसाठी घाडी हे उपमहापौर असणार आहेत. भाजपकडून रितू तावडे आणि शीतल गंभीर यांच्या नावाची चर्चा होती, पण रितू तावडे यांनी बाजी मारली आहे.

मुंबई महापालिका निवडणुकांचा निकाल जाहीर होऊन पंधरा दिवसांहून अधिक काळ लोटला. मात्र, अद्यापही महापौर आणि उपमहापौरांची नावे जाहीर झाली नव्हती. अखेर ही नावे जाहीर झाली आहेत. शिवसेना आणि भाजपाची आज संयुक्त बैठक होऊन महापौर आणि उपमहापौर पदासाठी उमेदवार अंतिम करण्यात आले. भाजपाचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी महापौर पदासाठी आणि शिवसेनेचे नेते राहुल शेवाळे यांनी उपमहापौर पदासाठी उमेदवार जाहीर केले. त्यानुसार, भाजपाच्या रितू तावडे यांचं नाव मुंबईच्या महापौर पदासाठी अंतिम करण्यात आलं असून उपमहापौर पदासाठी संजय घाडी यांचं नाव अंतिम करण्यात आलं आहे. या दोघांनीही उमेदवारी अर्ज भरले आहेत.

मुंबई महापालिकेत शिवसेना आणि भाजपा यांनी संयुक्त निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत शिवसेना-भाजपाच्या युतीला बहुमत मिळाले. त्यामुळे त्यांनी महापौर पदासाठी दावा केला. मात्र, महापौर पदावरून दोन्ही पक्षांत मतभेद झाल्याचं पाहायला मिळालं. मात्र, आता अंतिम निर्णय घेण्यात आला असून भाजपाला महापौर पद मिळालं असून शिवसेनेला उपमहापौरपद मिळालं आहे. त्यानुसार, भाजपाच्या रितू तावडे यांना महापौर पदासाठी आणि शिवसेनेसेचे संजय घाडी यांना उपमहापौर पदसाठी उमेदवारी देण्यात आली आहे. ११ फेब्रुवारी रोजी होणार महापौर पदासाठी निवडणूक महापौर आणि उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन अर्ज भरण्याची अंतिम मुदत ७ फेब्रुवारी म्हणजेच आज संपणार आहे. त्याआधीच शिवसेना भाजपाने आपले उमेदवार जाहीर केले. महायुतीकडून महापौर आणि उपमहापौर पदासाठी अर्ज दाखल केले गेले आहेत. येत्या ११ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता महापौर पदासाठी निवडणूक होणार आहे. दरम्यान, शिवसेना (ठाकरे) पक्षाकडून अद्याप अधिकृत उमेदवार जाहीर झालेले नसल्याने बिनविरोध निवडणुकीची चर्चा पालिकेत सुरू झाली आहे.

# खेळाडूंना ५ टक्के आरक्षणाचा लाभ जलदगतीने मिळण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञान वापरण्यास मान्यता

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** - गुणवत्ताधारक शासकीय व निमशासकीय सेवेमधील ५ टक्के आरक्षणाचा लाभ खेळाडूंना पारदर्शक, जलद व त्रुटीमुक्त पद्धतीने मिळावा, यासाठी ब्लॉकचेन व कृत्रिम बुद्धिमत्ता या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने मान्यता दिली असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी दिली.

रश्मी आंबेडकर म्हणाल्या की, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या सर्व अधिकृत एकविध क्रीडा संघटनांनी स्पर्धा संपल्यानंतर ७ दिवसांच्या आत स्पर्धेचा अंतिम निकाल, सहभागी खेळाडूंची यादी तसेच गुणपत्रिका अभिलेख जतनासाठी संचालनालयाकडे अपलोड करणे बंधनकारक आहे. ही सर्व माहिती संबंधित क्रीडा संघटनेच्या अधिकृत पदाधिकाऱ्यांनी डिजिटल स्वाक्षरीद्वारे प्रमाणित करणे आवश्यक आहे. निर्धारित कालावधीत माहिती अपलोड न केल्यास संबंधित क्रीडा संघटनांचा डिफफॉल्टर यादीत समावेश करण्यात येणार आहे. तसेच खेळाडूंनी आपले 'क्रीडा ई-प्रमाणपत्र' क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. दोन्ही बाजूंनी अपलोड करण्यात आलेल्या माहितीची ऑनलाईन पद्धतीने पडताळणी केली जाणार आहे.

या नव्या प्रणालीमुळे खेळाडूंना पडताळणीसाठी प्रत्यक्ष विभागीय कार्यालयात येण्याची किंवा कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे खेळाडूंना ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक जलद व सुलभपणे मिळणार आहे. यासाठी खेळाडू व संबंधित क्रीडा संघटनांनी क्रीडा विभागास पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी केले आहे.

# राज्यातील १२ जिल्हा परिषदा, १२५ पंचायत समित्यांसाठी मतदान

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** - महाराष्ट्रातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांसाठी मतदान सुरू आहे. मतदानाला सकाळी साडेसात वाजल्यापासून सुरुवात झाली आहे. संध्याकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदान चालणार आहे. मतदानासाठी चोख पोलीस बंदोबस्त तैनात आहे. यावेळी २ कोटी ८ लाखाहून अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. निकाल सोमवार ९ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजल्यापासून जाहीर होणार आहे. मतमोजणी सकाळी दहा वाजल्यापासून सुरू होणार आहे.



जिल्हा परिषदेच्या ७३१ आणि पंचायत समित्यांच्या १,४६२ जागांसाठी मतदान होत आहे. रिंगणात असलेल्या एकूण ७,४३८ उमेदवारांचे भवितव्य राज्यातील तब्बल २ कोटी ८ लाख २० हजार ७०२ मतदार ठरवणार आहेत. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या निवडणुकीत मतदारांचा कल कोणाकडे असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, 'सर्व मतदारांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता निर्भयपणे आपल्या मतदानाचा हक्क बजावावा,' असे आवाहन राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केले आहे.

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांसाठी सकाळी ९.३० पर्यंत ७.८० टक्के मतदान छत्रपती संभाजीनगर येथील बिडकीन मतदान केंद्रावर पोलीस आणि उमेदवार प्रतिनिधी यांच्यात शाब्दिक चकमक रयत क्रांती शेतकरी संघटनेचे आ. सदाभाऊ खोत यांनी मरळनाथपूरमध्ये केलं मतदान छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोडमधील नायगाव येथील मतदान केंद्रावर भाजप उमेदवाराला धक्काबुक्की निवडणुकीत समाधानकारक कामगिरी करू : जयंत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार अकलूज : अर्जुनसिंह मोहिते पाटील मतदानावेळी सोबत मुलाला रुद्रराज मोहिते पाटीलला घेऊन आले.

# पवारांच्या मृत्यूचे राजकारण बंद करा! मुख्यमंत्री फडणवीसांनी खडसावले

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नगपूर** - अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले आहे. यासंदर्भात होत असणारा वाद हा अतिशय निरर्थक आणि चुकीचा आहे. प्रत्येक व्यक्ती स्वतःचे राजकारण यात कसं पाहता येईल, हा प्रयत्न करत आहे. हे अत्यंत चुकीचे आहे. अशा प्रकारचे खालच्या पातळीचे राजकारण बंद झाले पाहिजे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सर्वांना खडसावले.

शेवटी राज्याचे उपमुख्यमंत्री, राज्याचे अतिशय प्रसिद्ध व्यक्तिमत्व असणारे एक मोठे नेते अजितदादा पवार हे दुर्दैवाने आपल्यातून निघून गेले आहेत. त्यानंतर प्रत्येक व्यक्ती त्याच्या माध्यमातून राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहे. हे अतिशय चुकीचे आहे, असे ठाम मत मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केले.



अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर सुरू झालेल्या राजकीय वादांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या दुर्दैवी घटनेतून काहीजण राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत. जनतेत लोकप्रिय असलेले नेते अचानक आपल्यातून निघून गेल्यानंतर अशा प्रकारचे आरोप-प्रत्यारोप करणे अत्यंत चुकीचे आहे, असे फडणवीस म्हणाले.

मुंबईहून बारामतीकडे प्रचारसभेसाठी रवाना झाले असताना अजित पवार यांच्या विमानाचा धावपट्टीजवळ भीषण अपघात झाला होता. या अपघातात अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला. अपघातानंतर काही व्हिडिओ समोर आले, ज्यामध्ये विमान कोसळल्यानंतर मोठे स्फोट झाल्याचे दिसत होते. या पार्श्वभूमीवर विविध तर्कवितर्क व आरोप-प्रत्यारोप होऊ लागले आहेत. या अपघाताचे कारण शोधण्यासाठी सध्या सखोल चौकशी सुरू आहे. या घटनेनंतर काही तासांतच सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या शपथविधीवरूनही उलटसुलट चर्चा रंगल्या. त्यामुळे फडणवीसांनी स्पष्ट केले की, या सर्व घडामोडींमध्ये अनावश्यक राजकीय अर्थ लावणे योग्य नाही. दुःखद प्रसंगात संयम राखणे आणि कुटुंबीयांच्या भावनांचा आदर करणे आवश्यक आहे.

> ❝ अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले आहे. यासंदर्भात होत असणारा वाद हा अतिशय निरर्थक आणि चुकीचा आहे. प्रत्येक व्यक्ती स्वतःचे राजकारण यात कसं पाहता येईल, हा प्रयत्न करत आहे. हे अत्यंत चुकीचे आहे. अशा प्रकारचे खालच्या पातळीचे राजकारण बंद झाले पाहिजे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सर्वांना खडसावले.


माऊली टाईपरायटींग ॲन्ड कॉम्प्युटर इन्स्टीट्युट

Admission Open

Maharashtra Government Authorised Institute

COMPUTER TYPING COURSE

GCC - TBC - SSD

English 30/40/50 -wpm | Marathi 30/40-wpm | Hindi 30/40-wpm

MKCL

MS-CIT

आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

जिजाऊ नगर, जुन्या शांतीनिकेतन कॉन्व्हेंट जवळ, वरुड

# पक्षातील वाद शमवण्याऐवजी काँग्रेस नेत्यांची प्रशासनावर नाहक टीका?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**चंद्रपूर** – चंद्रपूरमधील गट नोंदणीच्या प्रकरणात काँग्रेस पक्षाकडून प्रशासनावर अनावश्यक टीका करण्यात आलीय. एका लोकप्रतिनिधींनी तर आम्ही दबावात काम करत असल्याचे बिनबुडाचे आरोप केले. असे आरोप करण्याची कोणतीही गरज नव्हती, अशा शब्दात नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी या संपूर्ण वादात पहिल्यांदाच त्यांचे मत व्यक्त केले आहे. एबीपी माझाशी एक्सक्लुझिव्ह बातचीत करताना विभागीय आयुक्तांनी काँग्रेसच्या गट नोंदणी प्रकरणातील प्रत्येक बाब स्पष्टरित्या सांगितली. एकाच राजकीय पक्षात दोन तीन गट नोंदवण्याची कोणतीही तरतूद कायद्यात नाही. त्यामुळे काँग्रेस पक्ष एकत्रित आल्याशिवाय आम्हाला गट नोंदणीची कुठलीही कायदेशीर संधी नव्हती. काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकत्रित येण्यासाठी एवढे दिवस लावले, आम्ही कोणाच्याही दबावाखाली काम करण्याचे कुठलेही कारण नाही.

# श्री नागद्वार मंदिरातील त्रिशुल पोहोचला पचमढीला

## ‘हर बोला हर महादेव’ च्या गजरात शेंदुरजनाघाट नगरी दुमदुमली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





***शेंदुरजनाघाट*** – येथील नागव्दार मंदिरातील ६५ किलोचा ११ फुट उंच त्रिशुल शेंदुरजनाघाट येथुन पचमढी चौरागड नेवुन परत मंदिरात अणण्यात आल.

शेंदुरजनाघाट येथे शेकडो वर्ष पुरातन मंदिर असुन नागपंचमी व महाशिवरात्री उत्सव साजरा करतात. महाशिवरात्री उत्सवाकरीता जयत तयारी सुरु असुन याच उत्सवाकरीता ६५ किलो वजनाचा ११ फुट उंच त्रिशुल शेंदुरजनाघाट येथुन पचमढी चौऱ्या गडावर पुजनाकरीता शिवभक्तांनी नेण्याचा संकल्प केला आणि तो परत मंदिरात स्थापित करण्यात आला.

सर्वप्रथम त्रिशुल हनुमान मंदिरात माता चौक येथे आणुन पुजन व आरती करण्यात आली. यावेळी शिव भक्तांचा सत्कार भावना भोडेकर, शुभांगी होले, शिरभाते, योगीता होले व नागव्दार मंदिर समितीचे अध्यक्ष अनिल वसुले, गोपाल होले, बंडु तडस, पांडुरंग शिरभाते यांनी त्यांचे सत्कार केला.

यावेळी परीसरात शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर माता चौक, विंचुरकर चौक ते नागव्दार मंदिरापर्यंत वाजत गाजत मिरवणुक काढण्यात आली. यावेळी हर बोला हर महादेव या गजरात शेंदुरजनाघाट नगरी दुमदुमली होती. त्यानंतर तिथुन मोरखा मार्गे पचमढी चौऱ्या गाड्यावर तो त्रिशुल नेण्यात आला. तिथेही पुजन व आरती तसेच प्रदक्षिणा देण्यात आली व परत तो त्रिशुल नागव्दार मंदिरात आणण्यात आला. यामध्ये जयप्रकाश भोंडेकर, राजीव होले, दिलीप अठाऊ, पांडुरंग पाटील, प्रवीण राऊत, शरद पाटील, प्रदीप कडु, दामुब होले, गणपत सिनकर, चंदु चिमोटे, शेवतकर, भुपेंद्र बोडखे, प्रभाकर मोरे, रंजीत मालवीये, करन धुर्व, प्रफुल्ल तडस, दिनेश धुर्वे, दीपक राऊत व शिवभक्त सहभागी झाले होते.

# गणित सामान्य ज्ञान परिक्षेत जागृत इंग्लिश प्राइमरी स्कूलची नेत्रदीपक कामगिरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – नुकत्याच पार पडलेल्या वरुड तालुका गणित अध्यापक मंडळा तर्फे गणित सामान्य ज्ञान परिक्षेत जागृत नवयुक्त शिक्षण संस्था द्वारा संचलित जागृत इंग्लिश प्राइमरी व हायर प्रायमरी स्कूल येथील विद्यार्थी तालुक्यातुन शहरी विभागातुन वर्ग ५ मधुन नितीन बेलसरे व वर्ग ६ मधुन प्रांजली बाजड यांनी द्वितीय क्रमांक पटकावुन शाळेचे व पालकांचे नाव लौकिक केले.

गणित विषयाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने आयोजित या परिक्षेत हजारो विद्यार्थी सहभागी झाले. प्रणित व प्रांजली यांना या यशाबद्दल तालुका गणित अध्यापक मंडळा तर्फे सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. गणितातील कठीण संकल्पना सोप्या पद्धतीने सोडवण्याचे त्यांच्या कौशल्याचे शिक्षकांकडुन कौतुक होत आहे.

गणित विषयातील गोडी आणि सातत्यपुर्ण अभ्यासक्रम त्यांनी हे यश मिळविले आहे. जागृत नवयुवक शिक्षण संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे भरभरुन कौतुक केले. मुख्याध्यापिका पुजा मांडवगडे यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करुन त्यांना पुढील उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या तसेच पर्यवेक्षिका उज्वला लाडोळे यांनी विद्यार्थ्यांच्या या यशात शिक्षक व पालकांचा मोठा वाटा आहे, असे नमुद केले. यासोबत सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या व भरभरुन कौतुक केले. विद्यार्थ्यांनी या परिक्षेसाठी सचिन होले व निलीमा बोंडे यांनी मार्गदर्शन केले.

## आश्रमशाळेत कुसम-स्पर्श अभियान अंतर्गत

# प्रश्नमंजुषा व तपासणी शिबिर संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***धारणी*** – साद्रावाडी प्राथमिक आरोग्य अंतर्गत ग्राम खारी येथील आश्रमशाळेत वैद्यकीय अधिकारी डॉ.प्राजक्ता साबळे यांचे मार्गदर्शनाखाली कुसुम, स्पर्श कुष्टरोग अभियान राबविण्यात आले.

सर्व प्रथम जनजागृतीच्या माध्यमातुन कुष्टरोग या विषयावर प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली. विचारलेल्या प्रश्नांचे समर्पक अशी उत्तरे विद्यार्थ्यांनी दिलीत. त्यानंतर आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचारी यांचे माध्यमातुन संपुर्ण विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली तसेच संशयित आढळुन आलेल्यांची निम्न वैद्यकीय कर्मचारी जयकुमार इवणे यांचेकडुन तपासणी करण्यात आली.

सदर कार्यक्रमास आरोग्य विस्तार अधिकारी अशोक धांडे, आरोग्य सहाय्यक धर्मा वानखडे, आरोग्य सेवक प्रितेश मावस्कर, आशा स्वयंसेविका अनिता पाचबोले व निलवंती धुर्वे उपस्थित होते.

# तटकरे प्रदेशाध्यक्ष, प्रफुल्ल पटेल कार्याध्यक्ष, त्यांनी जबाबदारीने पाऊल उचललं तर ते 'व्हिलन' कसे ठरू शकतात? हसन मुश्रीफांकडून दोघांची जोरदार पाठराखण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***मुंबई*** – दादांच्या अचानक जाण्याने मीटिंग कोणी बोलवायची? जर सुनील तटकरे प्रदेशाध्यक्ष आहेत आणि प्रफुल्ल पटेल कार्याध्यक्ष आहेत, तर त्यांनी जबाबदारीने पाऊल उचलले तर ते 'व्हिलन' कसे ठरू शकतात? असा सवाल वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेस हा आमचा स्वतंत्र पक्ष आहे, त्यामुळे त्यात इतरांनी लुडबुड करण्याची गरज नाही. 'आम्ही दुःखात असताना ही मंडळी विनाकारण टीका का करत आहेत? ज्या नेत्याने मला ३०-४० वर्षे सांभाळले, त्यांच्या निधनानंतर मी जे सत्य घडले तेच बोललो आहे,' असे मुश्रीफ यांनी स्पष्ट केले. अपघातानंतर त्यांच्या कुटुंबीयांची इच्छा होती की लवकरात लवकर सुनेत्रा वहिनींचा शपथविधी व्हावा. पवार घराणे हे पुरोगामी असल्याने तिसऱ्या दिवसाचे विधी आटोपल्यानंतर चौथ्या दिवशी त्यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. विलीनीकरणाच्या चर्चेवर काय म्हणाले? हसन मुश्रीफ यांनी सांगितले की, विलीनीकरणाच्या ज्या चर्चा सुरू आहेत, त्या चर्चेमध्ये फक्त अजित दादा होते, आम्ही कोणीही प्रमुख माणसे नव्हतो असा आमचा दावा आहे. जर सुनेत्रा वहिनी, कुटुंबीय आणि राष्ट्रवादीचे सर्व नेते एकत्रीकरणाच्या मताचे असतील, तर त्यामध्ये कोणतीही अडचण येण्याचे कारण नाही. पक्ष जो निर्णय घेईल, तीच माझी भूमिका असेल.

# अतिवृष्टी गारपिटीचे अनुदान तत्काळ द्या

## अन्यथा शेतकऱ्यांचे आमरण उपोषण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – तालुक्याती लोणी व राजुरा बाजार महसुल मंडळात सन २०२३ मध्ये अतिवृष्टी व सन २०२४ मध्ये गारपीट व सन २०२५ मध्ये सततचे पाऊस या सर्व बाबीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले म्हणुन शासनाने शेतकऱ्याकरीता अनुदान मंजुर केले परंतु काही शेतकऱ्यांना आजपर्यंत अनुदान मिळाले नाही तर गारपीट २०२४ चे अनुदान शासनाने जीआर मध्ये हंगाम हा चुकीचा शब्द टाकुन लोणी व राजुरा बाजार महसुली मंडळातील शेतकऱ्यांचे अनुदान अडकुन ठेवले होते.

यावेळी किसान न्याय हक्क संघर्ष समिती व शेतकरी यांनी तहसील कार्यालय येथे ५ दिवस आमरण उपोषण केले होते. त्यावेळी शासनाकडे पाठ पुरावा केल्याने शासनाने नवीन शासन निर्णय निर्गमित करुन लोणी व राजुरा बाजार महसुली मंडळातील शेतकऱ्यांना गारपिट २०२४ चे अनुदान द्या, असा शासन निर्णय नोव्हेंबर २०२५ मध्ये काढला परंतु प्रशासनाकडून पैसे मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी पुन्हा जानेवारी २०२६ असे तहसीलदार यांचे कक्षात ठिय्या आंदोलन केले होते.

त्यावेळी तहसीलदार यांनी येत्या १५ दिवसात सर्व शेतकऱ्यांना अनुदान मिळणार, असे सांगितले. त्यावेळी शेतकऱ्यांच्या वतीने किसान न्याय हक्क संघर्ष समितीचे वतीने सांगण्यात आले की, आता आणखी १५ दिवस वाट पाहु जर शेतकऱ्यांना पंधरा दिवसात अनुदानाचे पैसे मिळाले नाही तर आम्ही सर्व शेतकरी तहसील कार्यालय समोर आमरण उपोषणाला बसु, असा इशारा देण्यात आला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र उर्फ बबलु पावडे, उपसभापती बाबाराव मांगुळकर, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष तुषार निकम, सुधाकर दोड, समितीचे स्वप्नील खांडेकर, धनंजय बोकडे, अमर ठाकरे, वैभव पोतदार, गणेश खरड, मनोज गेडाम, मनोज इंगोले, विलास सोनारे, दिनेश गाडरे, अंकुश बोंडनाशे उपस्थित होते.

# स्कूल ऑफ स्कॉलर्स येथे भव्य कला व विज्ञान प्रदर्शन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)






**वरुड** – स्कूल ऑफ स्कॉलर्स येथे आयोजित एकदिवसीय कला व विज्ञान प्रदर्शन अत्यंत उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा उत्तम मिलाफ या प्रदर्शनात पाहायला मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय ज्ञानपरंपरेनुसार दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवर पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यानंतर सर्वप्रथम कला प्रदर्शनाची पाहणी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. जागतिक कीर्तीचे कलाकार युवराज ठाकरे यांच्या हस्ते कला प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. विद्यार्थ्यांनी सादर केलेली चित्रे, हस्तकला, शिल्पकला व विविध कलाकृती पाहून मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. या कलाकृतींमधून विद्यार्थ्यांची सामाजिक जाणीव, कल्पकता व कलात्मक संवेदनशीलता प्रकर्षाने दिसून आली.

त्यानंतर विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटन व परिक्षण प्रा.डॉ.अतुल वंजारी, प्रा.परिक्षित पाटील व शुभांगी हेडाऊ यांच्या हस्ते करण्यात आले. विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी कार्यशील मॉडेल्स, प्रयोग, प्रकल्प व प्रात्यक्षिके सादर करुन दैनंदिन जीवनाशी निगडित वैज्ञानिक संकल्पना प्रभावीपणे समजावून सांगितल्या पर्यावरण संवर्धन, नवीकरणीय ऊर्जा, जलव्यवस्थापन, आरोग्य विज्ञान व आधुनिक तंत्रज्ञान हे विज्ञान प्रदर्शनाचे प्रमुख विषय होते. विद्यार्थ्यांनी दिलेली आत्मविश्वासपूर्ण माहिती व थेट प्रात्यक्षिके पाहुण्यांना विशेष भावली. उपस्थित पालक, शिक्षक व पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे भरभरुन कौतुक केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी प्राचार्य सुनीत कुमार दुबे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अशा प्रदर्शनांमुळे वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता, पर्यावरणीय जाणीव व चिकित्सक विचारशक्ती विकसित होते, असे मत व्यक्त केले. तसेच शिक्षकांच्या मेहनतीचे त्यांनी विशेष कौतुक केले.

या प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी उपप्राचार्या रिया टिडके, शैक्षणिक समन्वयक रुपाली काळे, विज्ञान प्रदर्शन प्रमुख हेमाली चौधरी, कीर्ती पांडव, वृषाली येवले व भाग्यश्री पांडे यांनी मोलाचे योगदान दिले.

या कार्यक्रमाचे संचालन मास्टर शौर्य आचार्य व पुनवी नंदनवार तसेच आभार प्रदर्शन स्वरा खासबागे यांनी केले. कला विभागातील कपिल तरार व मयूर पळसकर यांच्या अथक परिश्रमामुळे कला प्रदर्शन विशेष प्रभावी ठरले. संपूर्ण अध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

**-सुविचार-**

**माझ्या परवानगी शिवाय मला कुणीही दुखावू शकत नाही : महात्मा गांधी**

## संपादकीय


### स्थलांतराची लाट आणि बदलते राष्ट्र : न्यूझीलंडचा आरसा

न्यूझीलंड सध्या एका मोठ्या स्थित्यंतराच्या उंबरठ्यावर उभा आहे. शांत, स्थिर, समृद्ध आणि सामाजिक सुरक्षिततेचे प्रतीक मानले जाणारे हे बेटराष्ट्र आज वेगळ्याच कारणांनी जागतिक चर्चेत आले आहे. अलीकडच्या काळात न्यूझीलंडमधून समुद्र ओलांडून ऑस्ट्रेलियात स्थलांतर करणाऱ्या मानवी कुटुंबांचे थवे वाढताना दिसत आहेत. ही दृश्ये केवळ आकडेवारीपुरती मर्यादित राहिलेली नाहीत, तर ती राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय वास्तवाचे द्योतक ठरत आहेत. प्रश्न असा आहे की, याचा अर्थ नक्की काय? हे फक्त न्यूझीलंडपुरते मर्यादित आहे की जागतिक पातळीवर सुरू असलेल्या व्यापक बदलांचेच हे एक प्रतिबिंब आहे? न्यूझीलंडचा इतिहास पाहिला तर स्थलांतर ही त्यासाठी नवी बाब नाही. युरोपियन वसाहतवाद, माओरींचा संघर्ष, नंतरची लोकशाही व्यवस्था आणि सामाजिक कल्याणकारी धोरणेया सगळ्यांतून न्यूझीलंडने स्वतःची ओळख घडवली. शिक्षण, आरोग्य, सामाजिक समता आणि निसर्गसंवर्धन यासाठी ओळखले जाणारे हे राष्ट्र अनेक देशांसाठी आदर्श मानले गेले. मात्र गेल्या काही वर्षांत ही प्रतिमा हळूहळू बदलू लागली आहे. ऑस्ट्रेलियाकडे होणाऱ्या स्थलांतरामागे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे आर्थिक अस्थैर्य. न्यूझीलंडमध्ये घरांच्या किमती प्रचंड वाढल्या आहेत. तरुण कुटुंबांना घर घेणे तर दूरच, भाड्याने घर मिळवणेही कठीण होत चालले आहे. जीवनावश्यक वस्तू, इंधन, वीज, शिक्षण आणि आरोग्य सेवांचा खर्च वाढलेला असताना, वेतनवाढ मात्र त्या प्रमाणात झालेली नाही. परिणामी, काम करूनही आयुष्य उभे राहत नाही ही भावना बळावत आहे. याच्या तुलनेत ऑस्ट्रेलिया अधिक संधी देणारा देश म्हणून समोर येतो. जास्त वेतन, मोठा रोजगार बाजार, तुलनेने मजबूत अर्थव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्यहे सगळे घटक न्यूझीलंडमधील मध्यमवर्गीय आणि तरुणांना आकर्षित करत आहेत. विशेषतः कुशल कामगार, आरोग्यसेवा क्षेत्रातील कर्मचारी, अभियंते आणि आयटी व्यावसायिक मोठ्या संख्येने ऑस्ट्रेलियाचा मार्ग धरत आहेत. हे केवळ व्यक्तींचे स्थलांतर नसून, कुटुंबांसह होणारी हालचाल असल्याने न्यूझीलंडसाठी ही अधिक गंभीर बाब ठरते. मात्र हा प्रश्न केवळ अर्थकारणापुरता मर्यादित नाही. राजकीय अस्थैर्य, धोरणात्मक अनिश्चितता आणि भविष्याबाबतचा संभ्रमही या स्थलांतराला खतपाणी घालत आहे. कोविडनंतरच्या काळात अनेक देशांप्रमाणेच न्यूझीलंडलाही आर्थिक पुनर्बांधणीचा संघर्ष करावा लागतो आहे. कररचना, सरकारी खर्च, सामाजिक कल्याण योजनांवरील ताण आणि सार्वजनिक सेवांतील मर्यादाया सगळ्यांचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या जीवनमानावर होत आहे. या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो: हे फक्त न्यूझीलंडमध्येच घडते आहे का? याचे उत्तर स्पष्टपणे 'नाही' असे आहे. जगभरात स्थलांतराच्या लाटा उसळताना दिसत आहेत. युरोपमधील तरुण कामगार जर्मनी, कॅनडा किंवा ऑस्ट्रेलियाकडे वळत आहेत. आफ्रिकेतील युवक रोजगारासाठी युरोपकडे धाव घेत आहेत. दक्षिण आशियातील देशांमधून भारत, बांगलादेश, श्रीलंका मोठ्या प्रमाणावर लोक परदेशात नोकरी, शिक्षण आणि चांगल्या जीवनमानाच्या शोधात जात आहेत. आजचे स्थलांतर हे केवळ दारिद्र्यामुळे होणारे स्थलांतर राहिलेले नाही. ते संधींच्या शोधातील स्थलांतर बनले आहे. जागतिकीकरण, डिजिटल तंत्रज्ञान आणि खुल्या अर्थव्यवस्थेमुळे लोकांना पर्याय दिसू लागले आहेत. एका देशात संधी मर्यादित वाटू लागल्या की दुसऱ्या देशात जाणे आता असामान्य मानले जात नाही. न्यूझीलंडमधून ऑस्ट्रेलियाकडे जाणारे कुटुंबांचे थवे हे याच जागतिक प्रवाहाचा भाग आहेत. तथापि, न्यूझीलंडसाठी ही बाब अधिक चिंताजनक आहे कारण हा देश लोकसंख्येने लहान आहे. कुशल मनुष्यबळाचा ओघ बाहेरच्या दिशेने वाढत राहिला तर त्याचा थेट परिणाम अर्थव्यवस्थेवर, सार्वजनिक सेवांवर आणि दीर्घकालीन विकासावर होणार आहे. 'ब्रेन ड्रेन' ही संज्ञा येथे पुन्हा चर्चेत आली आहे. आरोग्यसेवा, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात कुशल लोकांची कमतरता निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याच वेळी, स्थलांतर हा केवळ तोटा म्हणून पाहणेही अपुरे ठरेल. इतिहास सांगतो की स्थलांतरामुळे ज्ञान, अनुभव आणि जागतिक दृष्टिकोनही वाढतो. अनेकजण परदेशात स्थिरावल्यानंतर गुंतवणूक, कौशल्य आणि नव्या कल्पनांसह पुन्हा मायदेशी परततात. प्रश्न आहे तो योग्य धोरणांचा. न्यूझीलंड सरकारने रोजगारनिर्मिती, घरबांधणी, वेतनवाढ आणि सामाजिक सुरक्षेच्या उपाययोजना प्रभावीपणे राबवल्या तर हा ओघ काही प्रमाणात थांबवता येऊ शकतो. जागतिक पातळीवर पाहता, ही स्थिती राष्ट्र-राज्यांच्या बदलत्या भूमिकेचेही द्योतक आहे. आज राष्ट्र केवळ भौगोलिक सीमा राहिलेल्या नाहीत; त्या संधी, सुविधा आणि सुरक्षिततेचे केंद्र बनल्या आहेत. नागरिक 'भावनिक नात्यां'पेक्षा 'जीवनमान' अधिक महत्त्वाचे मानू लागले आहेत. हा बदल राजकारणासाठीही मोठे आव्हान घेऊन येतो आहे.

# त्यागमूर्ती माता रमाबाई भीमरावजी आंबेडकर

माता रमाबाई भीमराव आंबेडकर, ज्यांना आपण प्रेमाने 'रमाई' म्हणतो, त्यांचे जीवन म्हणजे त्याग, सोशिकपणा आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महाकार्याला दिलेला खंबीर आधार होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जे 'विश्वभूषण' बनले, त्यामागे रमाईचे अढळ धैर्य उभे होते.

मातोश्री रमाईचा १८९८ सालातील फेब्रुवारी महिन्याच्या सात तारखेला रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील वणंद ग्रामात झाला. भिकाजी धुत्रे (वलंगकर) आणि रखुमाबाई त्यांच्या पोटी जन्मलेल्या रमाचे बालपण गरिबीत गेले आणि लहानपणीच आई-वडिलांचे छत्र हरपले. १९०६ सालातील एप्रिल महिन्याच्या चार तारखेला मुंबईतील भायखळा मार्केटमध्ये वयाच्या ९ व्या वर्षी त्यांचा विवाह भीमराव रामजी आंबेडकर (बाबासाहेब) यांच्याशी झाला. लग्नानंतर भीमरावांनी त्यांचे नाव 'रमा' ठेवले.


त्यागमूर्ती रमाबाई भीमराव आंबेडकर

संसारातील खडतर प्रवास करून रमाई जीवन जगल्या. रमाईचा संसार हा काट्यांचा मार्ग होता. बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी परदेशात असताना रमाईनी अत्यंत हालाखीचे दिवस काढले. काबाडकष्ट केले. बाबासाहेब लंडन आणि अमेरिकेत शिकत असताना घरात पैशांची चणचण होती. रमाईनी शेण गोळा करणे, गोवऱ्या थापणे आणि लाकडे विकणे अशी कामे करून घर चालविले. त्यांना पाच अपत्ये होती झाली. यशवंत, गंगाधर, रमेश, इंदू आणि राजरत्न परंतु गरिबी असल्यामुळे औषधोपचाराअभावी यशवंत सोडून इतर चारही मुलांचा मृत्यू झाला. स्वतःची मुले दगावली असतानाही त्यांनी बाबासाहेबांच्या ध्येया आड दुःख येऊ दिले नाही.

उलट बाबासाहेबांना आधार दिला. बाबासाहेबांच्या यशात रमाईचा वाटा सिंहाचा आहे. बाबासाहेब म्हणत असत की,'जर रमा नसती, तर मी आज जे काही आहे ते बनू शकलो नसतो.'जेव्हा बाबासाहेब परदेशातून परतले आणि त्यांनी दलित उद्धाराचे कार्य हाती घेतले, तेव्हा रमाईनी समाजातील लोकांची सेवा केली. मातोश्री रमाई आंबेडकरांच्या त्यागाची एक घटना अत्यंत हृदयस्पर्शी आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या डिस्प्रेस्ड क्लासेस एज्युकेशन सोसायटी मार्फत चालविले जाणारे एक सिद्धार्थ वसतीगृह (काही संदर्भग्रंथांत याचा उल्लेख 'धारवाडचे वसतीगृह' असाही येतो) होते.हे वसतीगृह धारवाड येथे होते, जेव्हा बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी परदेशात होते आणि भारतात संस्था चालवण्यासाठी पैशांची मोठी चणचण भासत होती, तेव्हा या वसतीगृहातील मुलांच्या जेवणाचा प्रश्न निर्माण झाला होता.

मुलांवर उपाशी राहण्याची वेळ आली आहे हे समजताच, रमाई मातेने क्षणाचाही विचार न करता आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या आणि अंगावरील दागिने काढून दिले, जेणेकरून त्या मुलांच्या जेवणाची सोय होऊ शकेल. त्यांच्या याच अथांग प्रेमामुळे त्यांना 'आई' किंवा 'माता रमाई' असे संबोधले जाते .धारवाडच्या या वस्तीगृहात प्रामुख्याने दलित (तत्कालीन अस्पृश्य) समाजातील विद्यार्थी होते. विशेषतः ज्यांना उच्च शिक्षणासाठी शहरात राहण्याची सोय नव्हती, अशा गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना येथे प्रवेश दिला जात असे.ग्रामीण भागातील हुशार मुलांनी शहरात येऊन शिकावे आणि समाजात स्वाभिमानाने जगावे, हा यामागचा बाबासाहेबांचामुख्य हेतू होता. अत्यंत कष्टमय आणि त्यागी आयुष्य जगल्यानंतर २७ मे १९३५ रोजी मुंबईतील 'राजगृह' येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने बाबासाहेबांवर दुःखाचा डोंगर कोसळला होता.

त्याग, सोशिकता आणि समिधेसारखे जळत राहून समाजाला प्रकाश देण्याचे दुसरे नाव म्हणजे माता रमाई होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्यात त्यांचा वाटा एखाद्या भक्कम पायासारखा होता. माता रमाईचे जीवन सहनशील आणि त्यागी होते. त्यांचे जीवन कष्ट आणि संघर्षाने भरलेले होते. बाबासाहेब जेव्हा उच्च शिक्षणासाठी परदेशात गेले होते, तेव्हा रमाईनी अत्यंत गरिबीत दिवस काढले. अनेकदा उपाशी राहून किंवा केवळ पाणी पिऊन त्यांनी संसार ओढला, पण बाबासाहेबांच्या शिक्षणात कधीही अडथळा येऊ दिला नाही.

त्या बाबासाहेबांच्या कार्याचा आधारस्तंभ होत्या. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः म्हटले होते की, 'जर रमाईचा पाठिंबा नसता, तर मी इथपर्यंत पोहोचू शकलो नसतो.' रमाईनी संसाराची सर्व जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली, जेणेकरून बाबासाहेब आपले पूर्ण लक्ष समाजकार्य आणि अभ्यासावर केंद्रित करू शकतील.

रमाईनी समाजातील महिलांना एकत्र करून त्यांच्यात स्वाभिमानाची जाणीव निर्माण केली. त्यांनी बाबासाहेबांच्या चळवळीत सक्रीय सहभाग घेऊन महिलांना स्वच्छतेचे महत्त्व आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. महाडच्या सत्याग्रहात त्या बाबासाहेबांच्या सोबत होत्या. नाशिक येथील मंदिर प्रवेशाच्या लढ्यातही त्यांनी महिलांचे नेतृत्व केले आणि कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले. रमाईचे कार्य केवळ एका पत्नीपुरते मर्यादित नव्हते, तर त्या दीन-दलितांच्या, अनाथांच्या आणि शोषितांच्या 'आई' (रमाई) होत्या. त्यांचा त्याग आणि संयम हा सामाजिक क्रांतीचा पाया ठरला.

माता रमाईनी त्यांच्या आयुष्यात पाच चार अपत्यांचे मृत्यू एका आईसाठी हे दुःख सुसह्य नव्हते, तरीही त्यांनी स्वतःला सावरले. आपल्या मुलांच्या मृत्यूचे दुःख बाजूला सारून त्यांनी समाजातील हजारो दीन-दलित मुलांना आपली मुले मानले. बाबासाहेब बॅरिस्टर झाल्यानंतर आणि उच्च पदावर असतानाही रमाईनी आपला साधेपणा सोडला नाही.

त्या कधीही सोन्या-नाण्यांच्या मागे लागल्या नाहीत. त्यांचा स्वाभिमान इतका मोठा होता की, कठीण काळातही त्यांनी कधी कोणासमोर हात पसरले नाहीत. रमाई केवळ बाबासाहेबांच्या पत्नी नव्हत्या, तर त्या संपूर्ण दलित समाजाच्या 'आई' होत्या. बाबासाहेब जर 'सूर्य' होते, तर रमाई त्या सूर्याला तेजोमय ठेवणारी 'प्रकाशशक्ती' होत्या. अशा या प्रकाशशक्तीला १२८ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन?


**प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्यरत्न राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त**
**परिवर्तनवादी साहित्यिक, अमरावती.**
**मो.८०८७७४८६०९**


# फैसला नेते करणार की न्यायालय?

राष्ट्रवादी काँग्रेसमधील संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांना सध्या जोरदार छेद देणारी विधाने पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांकडूनच पुढे येत आहेत. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी अलीकडच्या काळात केलेली वक्तव्ये पाहता, अजित पवार गट आणि शरद पवार गट यांच्यातील दरी आणखी वाढत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येण्याची शक्यता सध्या तरी धूसर होत चालली आहे.



लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा अधूनमधून उफाळून येत होती. कार्यकर्त्यांमध्ये आणि स्थानिक पातळीवरही दोन्ही गट एकत्र येणार का? असा प्रश्न विचारला जात होता. मात्र, पक्षाच्या धोरणात्मक निर्णयप्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या नेत्यांनीच या चर्चांना पूर्णविराम देणारी मते मांडल्याने राजकीय चित्र अधिक स्पष्ट होत आहे.

प्रफुल पटेल यांनी राष्ट्रवादीची वैचारिक भूमिका, सत्तेतील सहभाग आणि भविष्यातील राजकीय वाटचाल यावर ठाम भूमिका मांडली आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सध्याच्या राजकीय वास्तवात स्वतंत्रपणे पुढे जाणेच अधिक योग्य आहे. विलीनीकरणाच्या चर्चांवर भाष्य करताना त्यांनी 'तर्कविरहित अंदाज' आणि 'माध्यमांतील चर्चांवर' पक्ष धोरण ठरत नसल्याचे संकेत दिले. या वक्तव्यामुळे एकत्र येण्याच्या चर्चांना मोठा धक्का बसला आहे.

ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांनीही याच धर्तीवर भूमिका मांडत, राष्ट्रवादीच्या सध्याच्या वाटचालीवर समाधान व्यक्त केले. सत्तेत असताना घेतलेले निर्णय, विकासकामांचा वेग आणि प्रशासकीय स्थैर्य यांचा उल्लेख करत त्यांनी वेगळ्या वाटेने जाण्याची गरज अधोरेखित केली. भुजबळ यांची भूमिका ही केवळ वैयक्तिक नसून, पक्षातील एका मोठ्या गटाची मानसिकता दर्शवणारी असल्याचे मानले जाते.


प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी तर अधिकच स्पष्ट शब्दांत विलीनीकरणाच्या चर्चांना नकार दिला. महाराष्ट्रातील संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास आणि आगामी निवडणुकांची तयारी यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. पक्ष मजबूत करणे हेच आमचे प्राधान्य आहे, असे सांगत त्यांनी कोणत्याही प्रकारच्या राजकीय तडजोडीला सध्या स्थान नसल्याचे सूचित केले.

एकूणच, राष्ट्रवादीतील प्रमुख नेत्यांची ही विधाने पाहता, दोन्ही गटांतील मतभेद केवळ व्यक्तीगत न राहता धोरणात्मक आणि राजकीय पातळीवर खोलवर रुजलेले दिसतात. त्यामुळे सध्या तरी विलीनीकरणाची शक्यता दुरावत असून, आगामी काळात दोन्ही राष्ट्रवादी स्वतंत्रपणेच आपली राजकीय लढाई लढताना दिसतील, हे जवळपास निश्चित मानले जात आहे.

विलीनीकरणाला छेद देणारी विधाने राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केली आहेत. एकूणच दोन्ही राष्ट्रवादींची एकत्र येण्याची शक्यता दुरावत आहे.

# अर्थसंकल्पातून उघडणार नव्या करिअरच्या वाटा : युवकांनी संधी ओळखण्याची गरज

आजचा काळ हा ज्ञान, तंत्रज्ञान आणि कौशल्यांचा काळ आहे. बदलत्या जगासोबत करिअरच्या संधीही झपाट्याने बदलत आहेत. याच पार्श्वभूमीवर सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात युवक, विद्यार्थी आणि नव्या पिढीच्या करिअरसाठी अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या आहेत. मात्र या संधींची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे तितकेच आवश्यक आहे. अर्थसंकल्पात आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डीप-टेक, ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे. येत्या काही वर्षांत या क्षेत्रांत लाखो रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. त्यामुळे केवळ पारंपरिक करिअरच नव्हे तर नव्या तंत्रज्ञानावर आधारित करिअरकडे विद्यार्थ्यांनी गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. देशातील खखढी आणि खखडल मध्ये नव्या टेक्नॉलॉजी फेलोशिप्स, संशोधनासाठी प्रोत्साहन, तसेच डिजिटल नेटवर्क मजबूत करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली आहे. यामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण व ऑनलाइन संधी उपलब्ध होणार आहेत. पर्यटन, आतिथ्य, डिजिटल नॉलेज ग्रिड, खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र, आयुर्वेद, स्टार्टअप्स आणि कौशल्याधारित प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे युवकांसाठी स्वरोजगार व उद्योजकतेच्या नव्या दारे उघडली आहेत. आता केवळ नोकरी शोधण्यापेक्षा कौशल्य आत्मसात करून स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी अधिक आहे. विद्यार्थ्यांनी या संधींचा लाभ घ्यायचा असेल तर आपल्या आवडी व क्षमतेनुसार करिअर निवडावे नव्या तंत्रज्ञानाची माहिती घ्यावी कौशल्यविकास, ऑनलाइन कोर्सेस व प्रशिक्षणाला प्राधान्य द्यावे संशोधन, स्टार्टअप्स व नवकल्पनांकडे सकारात्मक दृष्टीने पाहाव. अर्थसंकल्प म्हणजे केवळ आकड्यांचा खेळ नसून तो भविष्य घडवण्याचा आराखडा असतो. आजचा विद्यार्थी जर या योजनांची माहिती घेऊन योग्य दिशेने पावले टाकेल, तर उद्याचा भारत अधिक सक्षम, आत्मनिर्भर आणि प्रगत नक्कीच होईल. योग्य संधी ओळखा, योग्य निर्णय घ्या आणि उज्ज्वल करिअर घडवा हीच आजच्या अर्थसंकल्पाची विद्यार्थ्यांसाठीची खरी संदेशवाणी आहे.




**योगेश पंजाबराव चौधरी**
**कोंढाळी**


वरुड दर्पण हे दैनिक पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून दैनिक वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# न्यु ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटच्या विद्यार्थ्यांचे स्काऊट गाईड कॅम्पमध्ये घवघवीत यश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – सत्र २०२५–२६ मध्ये अमरावती भारत स्काऊट गाईड कॅम्प, उदखेड येथे आयोजित करण्यात आला होता. या कॅम्पमध्ये एकुण ५६ शाळांचा समावेश होता. स्काऊट आणि गाईड कॅम्प हे प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासासाठी आयोजित केले जाते, जी मुलांमध्ये नेतृत्व गुण, सामाजिक जबाबदारी, स्वावलंबन, निसर्गाशी असलेला संबंध आणि जीवन






कौशल्य विकसित करण्यासाठी मदत करते. या कॅम्पचा मुख्य उद्देश मुलांना शिस्तप्रिय आणि जबाबदार नागरिक बनवणे हा असतो. हा कॅम्प ४ दिवसांचा असुन त्यामध्ये वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले होते. जसे बँड पथक स्पर्धा, तंबु निरीक्षण स्पर्धा, शेकोटी स्पर्धा, बिन भांड्यांचा स्वयंपाक स्पर्धा, लोक नृत्य स्पर्धा, शोभायात्रा तसेच स्किलओ–रामा (हस्तकला व कौशल्य) इत्यादी विविध स्पर्धेमध्ये भाग घेऊन न्यु ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटच्या स्काऊट–गाईड विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. एकुण ७ बक्षिसे प्राप्त झाली आहे. त्यात मुलींच्या विभागातुन रिद्धी कराळे व मानसी महल्ले यांनी बिन भांड्यांचा स्वयंपाक स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला तर प्रियांशी इंगोले व श्रेष्ठा कडु यांनी हस्तकला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला तसेच कॅम्प मधील सर्व सहभागी मुलींनी तृतीय बँड पथक स्पर्धेत, तृतीय तंबु निरीक्षण स्पर्धेत, तृतीय शेकोटी स्पर्धेत, प्रथम क्रमांक शोभायात्रेमध्ये तर मुलांच्या विभागातुन सामुहगीत स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. शाळेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव शाम खंडेलवाल, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, सदस्य विनय यावलकर तसेच शाळेच्या प्राचार्या माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, पी.आर.ओ.किशोर देशमुख, प्रायमरी विभाग प्रमुख पराग भोंडे या सर्वांनी भरभरुन कौतुक व्यक्त केले. या स्काऊट गाईड कॅम्पचे स्काऊटर राजेश आकोटकर तर गाईड्स गीता शिंगरवाडे होत्या. हा कॅम्प यशस्वी करण्यासाठी सुमित नागपुरे, विश्वनाथ दिवाण, रोशन यावले, राणी देऊळकर, मेघा अडगुळकर, कल्पना कोसे, कार्तिकी खुरद, निलीमा आजणकर, स्वाती साब्रे, अनुश्री वांदे, सतीश शृंगारे, जया लांडगे, निर्मला गुल्हाने तसेच शाळेतील शिक्षक वृंदांनी अथक परिश्रम घेतले.

# मुंबई- पुणे एक्सप्रेसवे पुन्हा जाम! वाहनांच्या लांबच लांब रांगा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – गेल्या आठवडाभरापासून मुंबई–पुणे महामार्गावर वाहतुकीचे तीन– तेरा वाजल्याचे चित्र दिसत आहे. मंगळवारी मुंबई पुणे एक्स्प्रेसवर टँकर उलटला अनब तब्बल ३३ तास वाहतूक ठप्प झाली. या महाभयंकर ट्रॅफिकमध्ये अडकलेल्या प्रवाशांचे अतोनात हाल झाले. टँकर बाजुला हटवून वाहतूक सुरळीत करण्यात आली. मात्र आज पुन्हा महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. मुंबई पुणे महामार्गावर पुन्हा वाहतूक कोंडी मुंबई– पुणे द्रुदगती महामार्गावरुन



प्रवास करणाऱ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मुंबई पुणे हायवेवर आज पुन्हा एकदा वाहतूक कोंडी झाली आहे. शनिवार, रविवार सुट्टी असल्याने नागरिक तसेच पर्यटक घराबाहेर पडले आहेत. त्याचबरोबर मतदानामुळेही गावी जाणाऱ्यांचीही संख्या मोठी आहे.



**वरुड** : अंजनगाव सुर्जी येथे एआयएमआयएम जिल्हाध्यक्ष सय्यद मुजीब यांनी आकिब अहमद यांची एआयएमआयएमच्या वरुड शहराध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी आकिब अहमद यांना हाजी कय्युम साहब यांची नियुक्ती केली आहे. यावेळी अनेकांनी एआयएमआयएमपक्षाचे सदस्यत्व देखील घेतले. यावेळी ऐफाज काझी, मोहम्मद सरफराज, सज्जु भाई, इस्रायल भाई, उबैद भाई उपस्थित होते.

# ४२ व्या तीन दिवसीय जिल्हास्तरीय स्काउट-गाईड मेळाव्यात ना.तु.रडके हायस्कूलची उत्कृष्ट कामगिरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील रामविलास मुंधडा हायस्कूल, उदखेड येथे आयोजित ४२ वा तीन दिवसीय जिल्हास्तरीय स्काउट–गाईड मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात ना.तु.रडके हायस्कूल येथील स्काउट–गाईड पथकाने उल्लेखनीय सहभाग नोंदवित उत्कृष्ट कामगिरी केली.



मेळाव्यामध्ये सकाळी ६ वाजता रामधुन घेण्यात आली. त्यानंतर तंबु निरीक्षण, स्कलोरामा स्पर्धा, बँड पथक स्पर्धा तसेच भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

विविध उपक्रम व स्पर्धांमुळे संपुर्ण परिसरात शिस्त, उत्साह व सेवाभावाचे वातावरण निर्माण झाले होते. या मेळाव्यात एन.टी.आर.हायस्कूलच्या स्काउट–गाईड पथकाने उत्कृष्ट कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधुन घेतले.

शाळेतील एकुण १५ स्काउट व गाईड विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये एक गाईड लीडर सीमा सर्याम व एक स्काउट कॅप्टन निमकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्किलोरामा स्पर्धेमध्ये गाईड पथकाने द्वितीय क्रमांक पटकावुन शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला तसेच स्काउट विभागास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.


या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष गणोरकर, संपुर्ण कार्यकारिणी, सर्व सदस्य, मुख्याध्यापक योगेश बरडिया आणि सर्व शिक्षकवृंद यांनी स्काउट–गाईड पथकाचे मनःपुर्वक कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# वडिलांसोबत मतदानाला गेलेल्या मुलानं दाबलं इव्हीएमच बटन

## अकलूजच्या यशवंतनगर मतदान केंद्रावर धक्कादायक प्रकार, उमेदवार वडिलांचं अजब उत्तर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अकलूज** – राज्यभरात आज (७ फेब्रुवारी) जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांसाठी मतदानाची रणधुमाळी पार पडत आहे. सकाळपासूनच मतदानकेंद्रावर मतदानासाठी नागरिकांनी गर्दी केल्याचे चित्र आहे. अशातच अकलूजच्या यशवंतनगर मतदान केंद्रावरून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. जिल्हा परिषद उमेदवार अर्जून सिंह मोहिते पाटील यांच्यासोबत आलेल्या त्यांच्या लहान मुलाने ईव्हीएमचं बटन दाबले आहे.




दरम्यान, याबाबत अर्जुन सिंग मोहिते पाटील यांना विचारले असता ते म्हणाले 'मुलाला पाहायचे होते कि मतदान कसे करतात, म्हणून त्याला सोबत आत नेले होते' या अजब उत्तरानं उपस्थितांच्या भुवया उंचावल्या आहे. दरम्यान अधिकाऱ्यांच्या समक्ष हा प्रकार घडलाय. यावर आक्षेप घेतला नाही का विचारल्यावर अर्जुन सिंग मोहिते पाटील म्हणाले, कि अधिकाऱ्यांनी यावर आक्षेप घेतल्याचे त्यांनी सांगितले. मात्र मतदाराशिवाय इतर कुणालाही मशीनपर्यंत जाण्यास परवांगी नसते, अशातच हा प्रकार घडलाय. त्यामुळे या प्रकारामुळे नवीन वाद निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

चुकीचे बटन दाबल्यामुळे मशीन बंद, तासभर खोळंबा दुसरीकडे, अकलूजमधील एका केंद्रावर चुकीचे बटन दाबल्यामुळे मशीन बंद झाल्याची घटना घडलीय. सकाळच्या सुमारास अर्ध्या तासापासून लोके रांगेत उभे राहीले असताना बराच वेळ मशीन सुरू झाले नसल्याचे चित्र होतं. दरम्यान, जवळपास एक तासानंतर मशीनची दुरुस्ती झाली. अकलूज येथील यशवंतनगर मतदान केंद्रावर हा प्रकार घडला असून बराच वेळेच्या खोळंबा झाल्यानंतर पुन्हा मतदानाला सुरुवात झाली. अकलूज येथील यशवंत नगर मतदान केंद्रावर निवडणूक आयोगाने महिला मतदान केंद्र बनविले असून येथे सर्व कर्मचारी या महिला आहेत.

# दहावी, १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ५४ 'रायडर्स' सज्ज! ठाणे वाहतूक विभागाचा अनोखा उपक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – दहावी व बारा–वीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचता यावे, यासाठी माननीय पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे आणि सह आयुक्त डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे शहर वाहतूक विभागाकडून विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



परीक्षेच्या दिवशी उशीर होणे, वाहन बिघाड, वाहतूक कोंडी आदी कारणांमुळे अडचणीत सापडलेल्या विद्यार्थ्यांच्या मदतीला वाहतुक पोलीस सज्ज झाले आहेत. बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी रायडर सज्ज...! त्यानुसार, रस्त्यांवर ५४ रायडर्स तैनात केले असुन ट्राफिक कंट्रोल व्हॉटसअॅप क्रमांक व ट्राफिक कंट्रोल हेल्पलाईनसह १८ वाहतुक युनिटमध्ये संपर्क साधण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक जारी केले आहेत.

तरी, परिक्षेला पोहचण्यात रस्त्यावर अडचणी उद्भवल्यास वाहतुक पोलिसांच्या हेल्पलाईनवर संपर्क करावा, असे आवाहन वाहतुक उप आयुक्त पंकज शिरसाट यांनी केले आहे.

## न्यु ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा

# निरोप समारंभ उत्साहपुर्ण व भावनिक वातावरणात संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – न्यु ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच इयत्ता दहावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका माधुरी भोंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शाळेच्या मुख्याध्यापिका माधुरी भोंडे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना बोर्ड परिक्षेसाठी मार्गदर्शन करतांना नियोजनबद्ध अभ्यास, वेळेचे योग्य व्यवस्थापन व आत्मविश्वासाचे महत्त्व सांगितले. शिक्षकांनीही या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या आगामी



परिक्षांसाठी आणि पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्यात.

सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सर्व विषय शिक्षकांनी विशेष मार्गदर्शन केले. यामध्ये सविता आंडे यांनी इंग्रजी, मिनाक्षी वाहने हिंदी, विनोद भाकरे व अंचल काळे मराठी, अर्जुन कोहळे गणित, शितल टाकरखेडे, भावना देशमुख व गौतम वाघ यांनी विज्ञान, संगीता काळे सामाजिक शास्त्र तसेच नितीन वसु यांनी संगणक या विषयाचे निर्देशन केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी सुद्धा आपल्या मनोगतात त्यांच्या शालेय जीवनातील अनुभव व आठवणींना उजाळा दिला. यामध्ये हिमांशु बोडखे, हार्दिक बर्डे, साची काशीकर, पियुष गावंडे, प्रसन्न भुजाडे, वेदिका दंडाळे, वैष्णवी झोड, सेजल मेघांनी, भक्ती कुबडे आदी विद्यार्थी शाळेविषयी आठवणी सांगतांना भावनिक झाली होती. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना शाळेची आठवण म्हणुन भेटवस्तु देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व आभार विनोद भाकरे यांनी मानले.

शाळेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव शाम खंडेलवाल, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, सदस्य विनय यावलकर, शाळेच्या प्राचार्या माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, पी.आर.ओ.किशोर देशमुख, प्रायमरी विभाग प्रमुख पराग भोंडे, यासोबतच शाळेतील सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सी.बी.एस.ई.बोर्डच्या परिक्षेसाठी व त्यांच्या पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## ग्रामपंचायत सावंगा येथे

# प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – ग्रामपंचायत सावंगा येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

ग्रामपंचायत येथे आयोजित करण्यात आलेल्या ध्वजारोहणाला सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य गण व सर्व कर्मचारी उपस्थित होते तसेच सेवा सहकारी सोसायटीचे सर्व मान्यवर तसेच गावच्या पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, जिल्हा परिषद शाळा सावंगाचे सर्व शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, सी.आर. पी., गावातील सर्व प्रतिष्ठित नागरीक उपस्थित होते.



सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथे

# आईने आपली किडनी देऊन वाचविले मुलाचे प्राण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**अमरावती** – स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशलिटी) हॉस्पिटल अमरावती. येथे ६६ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

सदर रुग्ण हा तीन वर्षांपासून किडनी आजाराने त्रस्त असल्याने त्यासाठी बाहेर उपचार पद्धती चालू होती व काही वर्षांपासून डायलिसिस करत होता. तेव्हा डॉक्टरांनी रुग्णास व त्याच्या कुटुंबीयास किडनी प्रत्यारोपण विषयी माहिती दिली व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून होत असलेल्या यशस्वी व विनामूल्य शस्त्रक्रिया यासाठी रुग्ण विविध जिल्ह्यांमधून नव्हे तर इतर राज्यामधून सुद्धा येत असतात याविषयी महिती दिली. तेव्हा आज रुग्णालयात झालेले ६६ वे किडनी प्रत्यारोपण, हे २७ वर्षीय मोहम्मद सज्जाद मोहम्मद इब्राहिम यांची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. सदर रुग्ण हा मु. नायगाव ता .जि. अकोला येथील रहिवासी असुन मागील काही वर्षापासून डायलिसिस चालु होते मात्र डायलिसिस यावर दीर्घकाळ उपाय नसून व होणारा त्रास बघुन किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले त्यावेळी मुलाच्या पुढील भविष्याचा विचार करून आई. नाझपरवीन मोहम्मद इब्राहिम (४९ वर्ष) यांनी आपली एक किडनी मुलगा सज्जाद ला देण्याचा निर्णय घेतला, व आपली एक किडनी सज्जाद ला देऊन त्याला नवीन जीवन दिले.महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली. सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ.मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ. प्रणित काकडे, डॉ.नयन काकडे, युरो सर्जन डॉ.राहुल पोटोडे, डॉ.विक्रम देशमुख, डॉ.राहुल घुले, डॉ.प्रतिक चिरडे, डॉ.विशाल बाहेकर, बधिरिकरण तज्ञ– डॉ. रोहित हातगावकर, डॉ.बाळकृष्ण बागवाले, डॉ.दिपाली देशमुख, डॉ.अंजु दामोदर, डॉ.परिणिती, डॉ.विक्रांत कुळमेथे, डॉ.माधव ढोपरे, डॉ.जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ.रमणीय, डॉ.उज्वल अभ्यंकर, डॉ.प्रियंका कांबळे, डॉ.श्रद्धा जाधव, समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.सोनाली चौधरी, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने मधील एम.सी.ओ.डॉ.पायल रोकडे, डॉ.दिव्यांनी मुंदाने, आशिष तायडे त्याचप्रमाणे अधीसेविका चंदा खोडके यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर ज्योती तायडे, सरला राऊत, नीता कांडलकर, दिपाली तायवाडे, माधुरी सोनटक्के, विवेक तायडे, वैष्णवी निकम, कीर्ती तायडे, लता मोहता, नीलिमा मलवार, अक्षय पवार, मयुरी खेरडे, नीलिमा, अनु वडे, योगिश्री पडोळे, वैशाली ढोबळे, विशाखा बरवान, अर्चना मढावी, वैष्णवी टाकरखेडे, कोमल भालेकर, आर. गवई, दीक्षा बेलखेडे, आहारतज्ञ कविता देशमुख, रश्मिता दिघडे, श्रीधर ढेंगे, औषध विभागामधील योगेश वाडेकर, अमोल वाडेकर, प्रशांत शिरे , पंकज बेलुरकर, आशिष थुल, गजानन मातकर, शिवा भोंगाळे, आशिष मिश्रा, रुपेश हरडे, सुनीता ठाकूर, संगीता, दिपटे, भेंडकर, इंदू पाटील, गजानन चौधरी, प्रशांत थेटे, निलेश आत्राम इत्यादींचे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमध्ये विषेश सहकार्य होते.

# लग्नाच्या मिरणवूकीत चक्क नंग्या तलवारी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अकोला** – अकोला जिल्ह्यातील बाळापूर शहरात एक धक्कादायक प्रकार घडला आहे. काल (६ फेब्रुवारी) रात्री एका लग्नाच्या मिरणवूकीत नंग्या तलवार फिरवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. मात्र, या लग्न मिरवणुकीत तरुणांना नंग्या तलवारीसह नाचनं चांगलंच अंगाशी आलंय. कारण, डीजेवर तालावर काही तरुण या ठिकाणी नंग्या तलवारी फिरवत होते, याचं वेळी बाजूला उभ्या असलेल्या एका लहान मुलाच्या डोक्याला ही तलवार लागलीये. यात मुलाच्या डोक्याला मोठा मार लागलाये. तर त्याच्या डोक्याला ५ टाके लागले आहे. दरम्यान, मुलावर बाळापूरच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं होतं. या प्रकरणी बाळापूर शहर पोलीस पुढील तपास करतायेत. दरम्यान, एखाद्या कार्यक्रमात म्यानातून तलावर उपसली तरी प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई होते. मात्र, काल बाळापूरात या लग्न मिरवणुकीत अशाप्रकारे तलवारी फिरविल्याव जात असेल तर त्यावेळी पोलिसांकडून अक्षम्यपणे दुर्लक्ष झालं होत कां? असा सवाल उपस्थित होतोय.

# मेंढला प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामाची उच्चस्तरीय चौकशी करा : मयूर उमरकर

काळ्या रेतीचा सर्रास वापर : काम न थांबविल्यास उपोषणाचा पवित्रा

## परवानगी नसतानाही वापरली काळी रेती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**अंबाडा** – मेंढला येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत जुनी झाल्याने, तिथे नवीन वास्तू उभारण्यासाठी दिवंगत नेते बंडूपंत उमरकर व सलील देशमुख यांनी १० कोटी रुपये मंजूर केले होते.

सध्या या नवीन इमारतीचे काम सुरू आहे; मात्र हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असून त्यात सर्रासपणे मातीमिश्रित काळ्या रेतीचा वापर केला जात असल्याचा आरोप होत आहे. वारंवार तक्रार करूनही केवळ थातूरमातूर चौकशी केली जात असून संबंधित विभागाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे या बांधकामाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी माजी पंचायत समिती सदस्य मयूर उमरकर यांनी केली आहे. मेंढला येथील या नवीन इमारतीचे कंत्राट 'कुलकर्णी डिझाइन्स' या कंपनीकडे आहे. १० कोटी रुपये निधीतून हे काम सुरू असून, आतापर्यंत ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. मयूर उमरकर यांनी या निकृष्ट कामाबाबत माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याकडेही तक्रार केली होती. त्यानंतर अभियंत्यांनी तातडीने काम थांबवून चौकशीचे निर्देश दिले होते. मात्र, कंत्राटदार कंपनीने पुन्हा काम सुरू केले असून सर्व नियम धाब्यावर बसवले आहेत. हा प्रकार म्हणजे तक्रारीला केराची टोपली दाखवण्यासारखा आहे, अशी टीका उमरकर यांनी केली.


गोदामासारखे बांधकाम!

उमरकर यांनी पुढे असेही नमूद केले की, ' १० कोटी रुपयांच्या निधीतून एक भव्य रुग्णालय उभे राहणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात ही इमारत एखाद्या धान्याच्या गोदामासारखी दिसत आहे. घरकुल धारकांना रेती मिळत नसताना या ठेकेदाराने ३० ब्रास काळी रेती कुठून आणली, हा प्रश्नच आहे.' मेंढला हे नागपूर जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेले दुर्गम भाग आहे. येथील आरोग्य केंद्रात नेहमी रुग्णांची वदळ असते.

अपघाताच्या प्रसंगी प्राथमिक उपचारांसाठी हे केंद्र महत्त्वाचे असतानाही अधिकारी याकडे दुर्लक्ष का करत आहेत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. सखोल चौकशी न झाल्यास उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. 'अमित शाह यांच्याकडे तक्रार केली तरी काम सुरूच राहील' कंत्राटदाराची अरेरावी या बांधकामाबाबत ग्रामस्थांनी वारंवार अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या, मात्र अधिकारी फोन उचलत नाहीत किंवा कंत्राटदाराची पाठराखण करतात, असा आरोप नागरिक करत आहेत.







# गडचिरोलीत माओवाद्यांच्या मोरक्या प्रभाकरला कंठस्थान हे मोठं यश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नागपूर** – गडचिरोली पोलिसांच्या ३-६० जवानांच आणि पोलिसांच अभिनंदन करतो. अतिशय महत्त्वाचं ऑपरेशन त्यांनी केलेय. नक्षलवाद्यांच्या तुकडीची एकच कंपनी गडचिरोलीत शिल्लक होती. त्यातील प्रमुख ७ लोकांना कंठस्थान घालण्यात यश आलं आहे.

अतिशय कठीण परिस्थितीत हे ऑपरेशन राबवण्यात आलं. तीन दिवस आमचे पोलीस हे ऑपरेशन राबत होते. हा तो भाग आहे ज्या भागात आपण फारसे ऑपरेशन कधी केलेले नाही. अतिशय डेन्स असा हा भाग होता. त्यात दोन घेरे पोलिसांनी घातले आणि प्रचंड गोळीबार यावेळी दोन्ही बाजूने झाला. या मोहिमेत जवळपास ७ नक्षल्यांचा खात्मा झालाय. त्यात त्यांचा जो मोरक्या प्रभाकर होता, तो देखील मारला गेलाय. ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे.

त्यामुळे आता अगदी बोटावर मोजण्याइतके बडे नक्षली शिल्लक राहिले आहेत. आपल्या राज्याचा बाजूने अतिशय कमी प्रमान नक्षल्यांचे उरले आहे. यात दुर्दैवाने आपला एक पो–लीस जवान शाहिद झाला आहे, त्यांना मी अभिवादन करतो. त्यांच्या कुटुंबीयांची आम्ही काळजी घेऊ. सी–६० जवानांच्या विरतेमुळे अतिशय उत्तम कार्य झालं, अशी प्रतिक्रिया राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

गडचिरोलीतील पोलिसांनी राबवल्या नक्षलविरोधी मोहिमेच्या कारवाई संदर्भात ते नागपूर येथ बोलत होते. सोलर मॉडेलमध्ये १० हजार कोटीचा एमओयू; विदर्भासाठी मोठा फायदा आज अतिशय आनंदाची गोष्ट आहे.

२२ देशातील लोक अडवांटेज विदर्भासाठी आले. या २२ देशातील आंबेसिडर, हाय कमिशनर कौंसिल जनरल आले आहेत. त्यांच्या माध्यमातून विदर्भातील उद्योगाच्या संधी सगळीकडे पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहे. काही चजण केलेले आहे.

# खुले कारागृह मोर्शी येथे सिकलसेल तपासणी शिबिराचे आयोजन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**मोर्शी** – उपजिल्हा रुग्णालय मोर्शी अंतर्गत खुले कारागृह येथे सिकलसेल तपासणी करण्यात आली अरुणोदय विशेष मोहीम अंतर्गत सिकलसेल आजाराचे प्रमाण कमी करण्यासाठी तसेच सिकलसेल पूर्णतः नाहीसा करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे सिकलसेल रुग्ण व सिकलसेल वाहक यांचे समुपदेशन व औषधोपचार केल्या जात आहे.

या मोहिमे अंतर्गत ० ते ४० वयोगटातील सर्वांची मोफत तपासणी करून घ्यायची आहे ही मोहीम उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर प्रमोद पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून या तपासणी शिबिरामध्ये खुले कारागृहचे अधीक्षक सतीश हीरेकर खुले कारागृह चे कर्मचारी उमेश रामपूरकर, अरविंद चव्हाण, नितीन खोब्रागडे उपजिल्हा रुग्णालयाचे प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी आशिष पाटील, लुंबिनी साने, नम्रता ठाकरे, विनय शेलुरे, प्रशांत बेहरे, प्रकाश मंगळे, नंदू थोरात यांनी सहकार्य केले.

# काळ्या बुरख्यावर हिरवे फेटे, मालेगावात इस्लाम पार्टीच्या नगरसेवकांची स्वॅगमध्ये एन्ट्री

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मालेगाव महापालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी आज शनिवारी निवडणूक होत आहे सकाळपासूनच शहराच्या राजकारणात कमालीची हालचाल पाहायला मिळत आहे. सकाळपासूनच शहराच्या राजकारणात कमालीची हालचाल पाहायला मिळत आहे. सकाळपासूनच शहराच्या राजकारणात कमालीची हालचाल पाहायला मिळत आहे. सकाळपासूनच शहराच्या राजकारणात कमालीची हालचाल पाहायला मिळत आहे. सकाळपासूनच शहराच्या राजकारणात कमालीची हालचाल पाहायला मिळत आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. इस्लाम पार्टीने महापालिकेत सत्तास्थापनेचा दावा केला आहे.

# स्कूल ऑफ स्कॉलर्समध्ये कार्निव्हल फेस्टिव्हल व आनंद बाजार साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**वरुड** – स्कूल ऑफ स्कॉलर्स वरुड येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा आनंद बाजार व कार्निव्हल फेस्टिव्हल अत्यंत उत्साह, आनंद व जल्लोषात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या संपूर्ण परिसरात कार्निव्हलसदृश वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांच्या आनंदासाठी विविध मनोरंजनात्मक खेळ, आकर्षक उपक्रम व करमणुकीच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. लहानग्यांपासून मोठ्या विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनी या उपक्रमांचा मनमुराद आनंद घेतला.

आनंद बाजाराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वतः नाश्त्याचे, खाद्यपदार्थांचे व चविष्ट पदार्थांचे विविध स्टॉल्स उभारले होते. या स्टॉल्सवर विद्यार्थ्यांनी विक्री, व्यवहार व संवाद कौशल्ये प्रत्यक्ष अनुभवातून आत्मसात केली. शाळेतील विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकांनी या स्टॉल्सना उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपक्रमाला यश मिळवून दिले. मनोरंजनाच्या मुख्य आकर्षणापैकी एक म्हणुन विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच शिक्षकांसाठी खुला रंगमंच ठेवण्यात आला होता. या रंगमंचावर नृत्य, गाणी, सादरीकरणे व मुक्त अभिव्यक्तीच्या माध्यमातून सर्वांनी मनसोक्त आनंद लुटला. विद्यार्थ्यांचा उत्साह आणि आनंद पाहून पालकांनीही समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमात विशेष आकर्षण ठरले ते शाळेचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले प्राचार्य सुनीतकुमार दुबे यांचे सेक्सोफोन वादन. त्यांच्या सुमधुर वादनाने संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले आणि उपस्थितांकडून जोरदार टाळ्यांचा कडकडाट झाला. प्राचार्यांचा हा सहभाग विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका अश्विनी पांडे व भाग्यश्री पांडे तर कार्यक्रमाची धुरा भावना खुजे यांनी सांभाळली तसेच मुलांच्या नृत्य सादरीकरणाचा कार्यभाग दर्शना रेवतकर हिने सांभाळला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल प्राचार्यांनी उपप्राचार्या रिया तीडके, शैक्षणिक समन्वयक रुपाली काळे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

हा आनंद बाजार व कार्निव्हल फेस्टिव्हल विद्यार्थ्यांसाठी आनंददायी, शिकवणुक देणारा व अविस्मरणीय अनुभव ठरला.




# बहीण दुबईत, भाऊ अमेरिकेत, मुलं सीए-इंजिनिअर, तरीही अट्टल चोर : एका गोष्टीमुळे अडकला

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – मुंबई आणि नवी मुंबई परिसरात धुमाकूळ घालणाऱ्या एका हायप्रोफाईल साखळी चोराला पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली आहे.

स्वत:ची ओळख लपवण्यासाठी आरोपीने कपड्यांपासून हेल्मेटपर्यंत सर्वकाही बदलले, पण त्याच्या 'पायातील बुटांनी' मात्र त्याला अडकवलं. ८० सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी या चोराचा माग काढला. मोहन कोकाटे (४९ वर्ष) असे या आरोपीचे नाव असून तो सायन परिसरात राहतो.

बुटांनी उघड केले गुपित आरोपी मोहन कोकाटे हा प्रत्येक चोरीच्या वेळी वेगळे कपडे परिधान करत असे आणि डोक्यावर हेल्मेट घालत असे, जेणेकरून त्याचा चेहरा दिसू नये.

# भारत अमेरिकेकडून ५०० अब्ज डॉलर्सची खरेदी करणार



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नवी दिल्ली** – भारत आणि अमेरिकेने अंतरिम व्यापार कराराचा आराखडा जाहीर केला आहे. या कराराअंतर्गत, भारतीय वस्तूंवरील अमेरिकेचे शुल्क ५० वरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आलं आहे.

रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी भारतावर लादण्यात आलेला अतिरिक्त २५ कर देखील काढून टाकण्यात आला आहे. दोन्ही देशांनी सांगितले की फ्रेमवर्क लवकरच लागू केली जाईल आणि वाटाघाटी व्यापक द्विपक्षीय व्यापार कराराच्या दिशेने पुढे जातील. भारत-अमेरिका संयुक्त निवेदनानुसार ही फ्रेमवर्क १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सुरू झालेल्या भारत-अमेरिका वाटाघाटींना पुढे नेईल.

भारत पुढील पाच वर्षांत अमेरिकेकडून ५०० अब्जची खरेदी करणार या करारात बाजारपेठेत प्रवेश, पुरवठा साखळी मजबूत करणे आणि व्यापारातील अडथळे कमी करणे या तरतुदींचा समावेश असेल. या कराराअंतर्गत, भारत अमेरिकन औद्योगिक वस्तूंवरील सर्व शुल्क काढून टाकेल किंवा कमी करेल.

◆ रशियाकडून तेल घेतल्यानं अमेरिकनं दंडित केलेला २५ टक्के टॅक्स आजपासून रद्द

वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी सांगितले की या करारामुळे भारतीय निर्यातदारांसाठी ३० ट्रिलियन बाजारपेठ खुली होईल. त्यांच्या मते, एमएसएमई, शेतकरी आणि मच्छीमार हे सर्वात मोठे लाभार्थी असतील आणि यामुळे महिला आणि तरुणांसाठी लाखो नवीन नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

# विश्वचषकाची रणधुमाळी सुरु

## आजपासून रंगणार १० व्या हंगामाचा थरार




(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – एकीकडे भारतीय युवा संघाने एकदिवसीय विश्वचषक उंचावलेला असतानाच शनिवारपासून भारताचा वरिष्ठ संघ टी-२० विश्वचषकाच्या अभियानाला प्रारंभ करणार आहे. भारत आणि श्रीलंका येथे संयुक्तपणे आयोजित करण्यात येणाऱ्या टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला शनिवारपासून प्रारंभ होत आहे. पाकिस्तान-नेदरलँड्स यांच्यात सलामीची लढत रंगणार असली, तरी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर सायंकाळी होणाऱ्या भारत-अमेरिका सामन्याकडे सर्वांचे लक्ष लागून असेल. ७ फेब्रुवारी ते ८ मार्च या कालावधीत रंगणाऱ्या या स्पर्धेत यंदादेखील २० संघ सहभागी होणार आहेत. प्रत्येकी पाच संघांचा एक असे चार गट बनवण्यात आले आहेत. भारत २०१६नंतर प्रथमच टी-२० विश्वचषकाचे यजमानपद भूषवत आहे. रोहितच्या नेतृत्वात २०२४मध्ये भारताने टी-२० विश्वचषक उंचावला.

# लाडक्या बहिणींना दिलासा : २६ लाख लाभार्थींना 31 मार्चपर्यंत 'ई-केवायसी'तील चूक सुधारता येणार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ घेण्यासाठी 'ई-केवायसी' प्रक्रिया करताना चुकीचा पर्याय निवडलेल्या जवळपास २६ लाख लाभार्थींना महिला आणि बालविकास विभागाने चूक सुधारण्याची संधी दिली आहे.

त्यानुसार लाभार्थी महिलांना ३१ मार्च २०२६ पर्यंत ही चूक सुधारता येईल. त्यानंतर यापुढे कोणत्याही परिस्थितीत सुधारणा करण्याची संधी दिली जाणार नाही, असे विभागाने स्पष्ट केले आहे. महिला आणि बालविकास




विभागाने गुरुवारी यासंदर्भातील शासन परिपत्रक जारी केले.

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळावा यासाठी पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्याचा निर्णय महिला आणि बालविकास विभागाने घेतला होता. त्यासाठी वेबपोर्टलवर 'ई-केवायसी'ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. तसेच 'ई-केवायसी' प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वेळीवेळी मुदतवाढ दिली गेली. अंतिम मुदतवाढ ३१ डिसेंबर २०२५ अशी होती. या मुदतीत जवळपास १ कोटी ८० लाख लाडक्या बहिणींनी 'ई -केवायसी' प्रक्रिया पूर्ण केली. मात्र 'ई-केवायसी' करताना लाभार्थ्यांला त्याच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम/कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक स्वराज्य संस्थेत कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे, याबाबतचा पर्याय निवडण्यास सांगण्यात आले होते. जवळपास २६ लाख लाभार्थी महिलांनी नजरचुकीने चुकीचा पर्याय निवडला. त्यामुळे या महिलांना लाभापासून वंचित रहावे लागणार होते.

# शिवसेनेतील नाराजीनाट्य चव्हाट्यावर, एकनाथ शिंदेंचा शिलेदार महानगरप्रमुख, नगरसेवकपदाचा राजीनामा देणार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – नाशिक महापालिकेच्या उपमहापौरपदी शिवसेना शिंदे गटाचे विलास शिंदे यांनी सूत्रे हाती घेतल्यानंतर पक्षातील अंतर्गत गटबाजी आणि नाराजीनाट्य उघडपणे समोर आले आहे.

शिंदे गटाचे नाशिक महानगर प्रमुख आणि नगरसेवक प्रवीण तिदमे यांनी सोशल मीडियावर जाहीरपणे नाराजी व्यक्त करत पक्षातील वरिष्ठ नेत्यांवर अप्रत्यक्षपणे गंभीर आरोप केले आहेत.

या घडामोडींमुळे शिवसेनेतील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. नाशिक महापालिकेत सोमवारी झालेल्या निवडणुकीत महापौरपदी भाजपच्या हिमगौरी आडके यांची, तर उपमहापौरपदी शिंदे गटाचे विलास शिंदे यांची निवड करण्यात आली.

उपमहापौर पदासाठी शिंदे शिवसेनेकडून प्रवीण तिदमे यांनीही अर्ज दाखल केला होता. मात्र भाजप-शिंदे गटाची युती झाल्यानंतर विलास शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. परिणामी भाजपचे मच्छिंद्र सानप आणि शिंदे गटाचे प्रवीण तिदमे यांनी अर्ज माघार घेतल्याने विलास शिंदे बिनविरोध विजयी झाले.

प्रवीण तिदमे महानगर प्रमुख, नगरसेवकपदाचा देणार राजीनामा या निर्णयानंतर प्रवीण तिदमे यांची नाराजी उघडपणे समोर आली आहे. त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून पक्षाचे उपनेते अजय बोरस्ते आणि नवनिर्वाचित उपमहापौर विलास शिंदे यांच्यावर टीका करत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. पक्षात वर्षानुवर्षे काम करूनही डावलले जात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

# माणसांप्रमाणे आता जमिनींनाही मिळणार भू आधार क्रमांक

## २ कोटींहून अधिक पोटहिश्शांचा 'डिजिटल' कायापालट, महसूलमंत्री बावनकुळेंचा ऐतिहासिक निर्णय

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**अमरावती** – माणसांप्रमाणे आता जमिनींनाही मिळणार भू-आधार क्रमांक मिळणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. राज्यातील शेतजमिनींच्या पोटहिश्शांची आता मोजणी होणार आहे. परिणामी, यामुळे ७/१२ आणि नकाशांचा मेळ बसणार असून २ कोटींहून अधिक पोटहिश्शांचा 'डिजिटल' कायापालट



होणार आहे.

**शेतजमिनींच्या नकाशा तसेच ७/१२ उतारामधील तफावत दूर करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल**

राज्यातील ग्रामीण भागातील शेतजमिनींच्या नकाशा तसेच ७/१२ उतारामधील तफावत दूर करण्यासाठी महसूल विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने राज्यातील शेतजमिनींच्या पोटहिश्शांची मोजणी करून नकाशे आणि अधिकार अभिलेख (७/१२) अद्ययावत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून आता जमिनींचे प्रलंबित वाद मिटण्यास मदत तर होईलच. शिवाय, प्रत्येक भूखंडाला आता 'भू-आधार' क्रमांक मिळणार आहे. राज्यात १८९० ते १९३० या काळात पहिली भूमापन प्रक्रिया झाली होती. त्यानंतर १९९२ पासून डिसेंबर २०२४ पर्यंत खरेदी-विक्री, वारस हक्क किंवा वाटणीमुळे तब्बल २ कोटी १२ लाख ७६ हजार ४९९ नवे पोटहिस्से तयार झाले आहेत. मात्र, या सर्व पोटहिश्शांची प्रत्यक्ष मोजणी न झाल्याने सरकारी दप्तरी नकाशे आणि ७/१२ उतारा यांचा ताळमेळ लागत नव्हता. ही अडचण दूर करण्यासाठी जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या स्तरावरून आता 'पोटहिस्सा मोजणीचा पथदर्शी प्रकल्प' सुरू करण्यात येत आहे. काय आहे 'भू-आधार'? -केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, प्रत्येक जमिनीच्या तुकड्याला आता म्हणजेच 'भू-आधार' क्रमांक दिला जाणार आहे. आधार कार्डाप्रमाणेच जमिनीची सर्व माहिती या एका क्रमांकावर उपलब्ध असेल.

### मोदींविरोधात विरोधी पक्ष आंदोलन करताना हत्येचा कटाचा संशय येतो, पण

# अजितदादांच्या संशयास्पद मृत्यूवर आम्ही बोलायचं नाही ही मुस्कटदाबी आहे का? तुम्ही अस्वस्थ का होताय? : संजय राऊतांचा हल्लाबोल

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – रोहित पवार हे अजित पवारांचे पुतणे आहेत, पवार कुटुंबाचे घटक आहेत. त्यांच्यामुळे विलिनीकरण, अजित पवार यांचा अपघात याविषयी त्यांच्या कुटुंबातल्या व्यक्तींनी बोलणं हे अधिक विश्वासाचं असेल. म्हणून ते जे काय बोलतात ते



तुम्ही ऐका. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी अजित पवारांच्या मृत्यूविषयी आणखी दाट संशय उपस्थित केला आहे. अजित दादांच्या विमानात कोणी बॉम्ब ठेवला होता का? कारण जेव्हा ते विमान आकाशात होतं आणि लँडिंगवेळ स्फोट झाला. अमोल मिटकरी यांनी शंका व्यक्त केल्या आहेत, छगन भुजबळ यांनाही संशय येत असल्याचे शिवसेना खासदार संजय राऊत यांनी म्हटलं आहे. आमचा घरातला माणूस गेलाय आणि तुम्ही म्हणताय गप्प बसा. बजरंग बाप्पा सोनावणे, छगनराव भुजबळ, अमोल मिटकरी हे जबाबदारीने बोलत असणार ना? आता आपल्याच आमदारांवरती फडणवीस डाफरतायत, गप्प बसा सांगतायत, हे काही योग्य नसल्याचे ते म्हणाले आहे.

